


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३२९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१० जुलै २०२५

# नागपुरात धुवाधार ! २४ तासांत रेकॉर्ड ब्रेक पाऊस

## ग्रामीण भागातही पावसाचा हाहाकार ; हंगामातील सर्वाधिक पाऊस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नागपूर :** उपराजधानी नागपूरमध्ये पावसाची जोरदार बॅटिंग सुरु आहे. मागील २४ तासांत पावसाने रौद्ररुप दाखवले आहे. नागपुरात यंदाच्या हंगामातील सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. यंदाच्या हंगामातील नागपुरातील ही सर्वाधिक नोंदवलेली पावसाची मात्रा आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूरमध्ये सर्वाधिक पाऊस झाला आहे. सलग पडत असलेल्या पावसामुळे शहरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले आहेत. शहरातील नरेंद्र नगर अंडरब्रीज आणि नव्याने बांधलेला सोमलवाडा अंडरब्रीज पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. दोन्ही रेल्वे अंडरब्रीजमध्ये चार ते पाच फूट पाणी साचल्याने नागपूर पोलिसांनी या मार्गावरील वाहतूक बंद केली आहे. पडोले चौक, शंकर नगर, गिट्टीखदान, हिंगणा रोड, मेडिकल चौक, रेल्वे स्टेशन परिसर आदी भागांत रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी नागरिक अडचणीत सापडले आहेत.



नागपूर शहरच नव्हे, तर ग्रामीण भागातही पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. सावनेरमधील चंद्रभागा आणि कोलार नद्यांना पूर आला असून पाण्याचा प्रवाह पुलावरून सुरू झाला आहे. त्यामुळे धापेवाडा ते पाटनसावंगी मार्गावरील पूल आणि कोलार नदीवरील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत.

शहरातील हुडकेश्वर आणि विहीरगाव परिसरातही पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली. या भागातील काही रहिवासी पाण्यात अडकले होते. आपत्ती व्यवस्थापन पथकाने आणि अग्निशमन विभागाने या दोन्ही भागांतून एकूण ६ जणांना सुखरूप बाहेर काढले. भारतीय हवामान विभागाने नागपूरसाठी पुढील २४ तासांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सातबारावर कारभारणीचंही नाव लागणार, सरकारचा मोठा निर्णय !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलडाणा :** महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाने आता सातबारावर पत्नीचे नाव नोंदणी शून्य खर्चात करण्याच मोठा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि शेतमालकीत थेट सहभाग मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने लक्ष्मी मुक्ती ही योजना सुरू केली आहे.

या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे महिलांना शेती मालमत्तेवर थेट हक्क प्रदान करणे. योजनेच्या अंतर्गत पती आपल्या नावावरील सातबारा उतारावर पत्नीचे नाव सहकता म्हणून अधिकृतपणे नोंद होऊ शकतो या उपक्रमामुळे महिलांना केवळ मालकीचा अधिकारच मिळणार नाही तर त्यांना आर्थिक निर्णय प्रक्रियेती सहभाग होता येणार आहे.

**हे कागदपत्रे जोडावे लागणार...**

अर्जासोबत काही आवश्यक कागदपत्रे जोडावे लागतात यात विवाह प्रमाणपत्र लग्न नोंद सातबारा उताराची सध्याची प्रत आणि आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र याचा समावेश होतो ही कागदपत्रे



अर्जाच्या प्रक्रियेला योग्य प्रकारे समर्थित करतात आणि नोंदणीसाठी आवश्यक असतात. लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत पत्नीचे नाव सातबारा उतारावर सह हिस्सेदार म्हणून नोंदवण्यासाठी कोणतेही नोंदणी फी शासकीय शुल्क किंवा मुद्रांक शुल्क आकारले जात नाही ही प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य असून लाभार्थ्यांनी कोणतीही दलालांच्या किंवा अन अधिकृत व्यक्तीच्या पूल तापांना बळी पडू नये असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत.

**तात्काळ प्रक्रिया करून दिली जाईल...**

लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत पत्नीला शेतीमध्ये सहजतेदार बनविण्यासाठी अर्ज करावा तात्काळ प्रक्रिया करून दिली जाईल शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा असे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील तहसीलदार सुनील पाटील यांनी आवाहन केले आहे. एकंदरीत या योजनेला जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरता शासन प्रयत्नशील आहे.

**अर्ज कसा करावा व कोठे?**

अर्ज करण्यासाठी अर्जदारांना आपल्या गावातील तलाठी कार्यालयात थेट संपर्क साधावा लागेल तलाठ्यांकडे पत्नीचे नाव सह हिस्सेदार म्हणून सातबारा उतारावर नोंदणीसाठी अर्ज सादर करावा लागणार आहे ही प्रक्रिया स्थानिक स्तरावर सहज आणि पारदर्शकपणे पूर्ण केली जाते.

**बचत गटातून कर्ज पुरवठा करता येणार**

लक्ष्मी मुक्ती योजना अंतर्गत महिलांना शेतमालकीचा हक्क मिळाल्यानंतर बचत गटांच्या माध्यमातून त्यांना कर्ज पुरवठा करता येणार आहे या योजनेमुळे महिलांना शेती संबंधित आर्थिक मदत सहज मिळता येईल ज्यामुळे त्यांच्या शेती व्यवसाय अधिक सक्षम आणि स्वावलंबी होण्यास या योजनेमुळे मदत होणार आहे.

# गुजरात पूल दुर्घटनेत 13 जण दगावले !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, गांधीनगर :** गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यात गंभीरा पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. ज्यामध्ये पुलावरुन जाणाऱ्या एका ट्रकसह तीन वाहनं थेट नदीत कोसळली आहेत. या दुर्घटनेतील मृतांचा आकडा आता १३ वर पोहोचला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. बचावकार्य अजूनही सुरू असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतही जाहीर केली आहे.



बुधवारी सकाळी ०७.३० च्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. गंभीरा पुलाचा काही भाग अचानक कोसळला आणि त्यावरून जाणारा एक ट्रक, व्हॅन आणि कार महासागर नदीत कोसळले. स्थानिक लोकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्याला सुरुवात केली आणि अग्निशमन दल तसेच पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी आणि आपत्कालीन पथकांनी घटनास्थळी पोहोचत बचावकार्य सुरू केले.

एका अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, 'पुलाचा काही भाग अचानक कोसळला. त्या भागातून जाणारी तीन वाहने नदीत कोसळली. आम्ही बचावकार्य सुरू केले आहे आणि आतापर्यंत १० जणांना बाहेर काढण्यात आले आहे.

गुजरातमधील वडोदरा शहरापासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेला हा पूल सौराष्ट्रकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग मानला जातो. परंतु पूल कोसळल्याने प्रशासनाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना फोन करून परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेत ज्यांनी प्राण गमावले त्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी शोक व्यक्त केला आहे आणि जखमी लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना केली आहे.

मृतांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी मधून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, गुजरात काँग्रेसने या घटनेसाठी राज्य सरकारला जबाबदार धरले आहे आणि त्यांच्यावर टीकेची झोड उठवली.

## थोडक्यात

### वाईत आशा सेविकांचे ढोल ताशा आंदोलन



**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.०९, वाई (सातारा) :** कोरोना काळात जीवाची परवा न करता नागरिकांना आरोग्य सेवा देणाऱ्या आशा सेविकांना अनेक महिन्यापासून मानधनापासून वंचित ठेवण्यात आले. या अन्यायाविरुद्ध वाई पंचायत समिती समोर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्यावतीने जोरदार ढोल ताशा बडवत आंदोलन करण्यात आले. रिपाईचे युवा अध्यक्ष स्वप्निल भाई गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. कोरोना काळात माणूस माणसापासून लांब पळत असताना आशा सेविकांनी जीव धोक्यात घालून आरोग्य सेवा केली. परंतु शासनाने त्यांनाच मानधनापासून वंचित ठेवले, राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत काम करणाऱ्या आशा सेविका ग्रामीण भागात माता व बालकांच्या आरोग्य सेवेत महत्त्वाचे योगदान देतात अशांना वेळेत व पुरेशी मानधन न मिळणे ही मोठी शोकांतिका वाटते. सर्व सेविकांना वेळेत पैसे मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही, आंदोलनाचा भडका राज्यभर उमटणार असल्याचे स्वप्निल गायकवाड, आनंदी अवघडे, मनीषा संकपाळ यांनी ठणकावून सांगितले. पुढील आक्रमक आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय सातारा व नंतरचे मुंबई मंत्रालय होणार असल्याचे स्पष्ट संकेत आंदोलनकर्त्यांनी दिले. यावेळी शेकडो आशा स्वयंसेविका ढोल ताशा आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

### राज यांचं मौन, तर उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** ठाकरे बंधूंच्या मेळाव्यामुळे राज्याच्या राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उद्धव आणि राज ठाकरे तब्बल २० वर्षांनी एकत्र आले. त्यांच्या मेळाव्याला मिळालेला प्रतिसाद पाहता शिवसेना उबाठा आणि मनसेची युती झाल्यास त्याचा मोठा फायदा ठाकरे ब्रँडला होऊ शकतो. ठाकरे ब्रँड संपवण्याचे प्रयत्न सुरु असल्याचं विधान खुद्द राज यांनी केलेलं आहे. यानंतर वरळीत झालेल्या मेळाव्यात उद्धव यांनी एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी, असं म्हणत युतीचे स्पष्ट संकेत दिले. म महापालिकेचा नव्हे, तर म महाराष्ट्राचा म्हणत त्यांनी मनसेसोबत दिर्घकालीन युतीचे संकेत दिले. पण अद्याप तरी राज यांच्या पक्षाकडून कोणताही प्रतिसाद शिवसेना उबाठाला मिळालेला आहे.

मीरारोडमध्ये काही दिवसांपूर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांनी अमराठी दुकानदाराला मारहाण केली. मराठी बोलण्यास नकार देणाऱ्या दुकानदाराला मनसेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिला. त्यानंतर अमराठी व्यापारी, व्यावसायिक, दुकानदारांनी मारहाणीच्या निषेधार्थ मोर्चा काढला. त्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून काल मनसैनिकांनी मोर्चा काढला. त्या मोर्चाआधी मनसेच्या नेत्यांची धरपकड करण्यात आली. त्यावेळी शिवसेना उबाठाचे नेते मोर्चाला पोहोचले. यानंतर काही वेळानं मनसेच्या नेत्यांची पोलिसांकडून सुटका झाली. मोर्चाची सांगता मनसे आणि शिवसेना उबाठा नेत्यांच्या भाषणांनी झाली. एकीकडे मनसे आणि शिवसेना उबाठाच्या नेत्यांचं, कार्यकर्त्यांचं मनोमिलन सुरु असताना दुसरीकडे राज ठाकरेंनी महत्त्वाचा आदेश काढला आहे. 'पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसंच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचं नाही. माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे, त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाहीये, आणि सोशल मीडियावर व्यक्त व्हायचं नाही,' असं फर्मान राज यांनी काढल्यानं संभाव्य युतीबद्दल संभ्रम वाढलेला आहे. संयुक्त मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी युतीसाठी राज ठाकरे यांना साद घातली. युतीबद्दल स्पष्ट संकेत दिले. पण राज यांच्याकडून अद्याप तरी उद्धव ठाकरेंना प्रतिसाद मिळालेला नाही. त्यातच मनसैनिक, अनेक नेते युतीसाठी आग्रही असताना राज यांनी त्यांना शांत राहण्याच्या सूचना दिल्यानं संभ्रम निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरेंच्या पक्षात महत्त्वाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

राज ठाकरेंनी युतीसाठी टाळी न दिल्यास काय करायचं, यावर उद्धवसेनेनं काम करण्यास सुरुवात केली आहे. स्वबळावर लढल्यास आणि काँग्रेसला सोबत घेतल्यास मुंबईसह अन्य महापालिकांमध्ये काय चित्र दिसेल, याची चाचपणी सुरु आहे. गेल्या तीन वर्षांत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या पक्षाला मुंबईसह आसपासच्या महापालिका क्षेत्रांमध्ये हादरे दिले आहेत. अनेक माजी नगरसेवक शिंदेसेनेत गेल्यानं उद्धव यांचा पक्ष कमकुवत झालेला आहे. त्यामुळे स्वबळावर लढल्यास उद्धवसेनेची अवस्था बिकट होऊ शकते. काँग्रेसच्या साथीनं मुंबईसह अन्य महापालिका निवडणुकीत उतरल्यास काय होईल, याची चाचपणीदेखील सुरु आहे. ठाकरेंना अद्याप मुंबईत जनाधार आहे. विधानसभेला उद्धवसेनेनं २० जागा जिंकल्या. त्यातील १० जागा मुंबईतील आहेत. मुंबईत असलेला मुस्लिम मतदार गेल्या दोन निवडणुकांमध्ये उद्धव यांच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. काँग्रेस सोबत असल्यास हा मतदार पुन्हा एकदा ठाकरेंच्या पाठीशी राहू शकतो. त्यामुळे काँग्रेसला सोबत घेतल्यास काय होऊ शकतं, याची चाचपणी केली जात आहे.

## संपादकीय

### 'कार्गो'ला व्हावे मोकळे आकाश

मुंबई पाठोपाठ नाशिकचे ओझर विमानतळ राज्यात दुसऱ्या स्थानी' बऱ्याच काळाने शुभवर्तमान कानी पडल्याने नाशिकसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्र सुखावला. आंतरराष्ट्रीय स्तरावर हवाई मालवाहतूक करणाऱ्या देशातील प्रमुख ठिकाणांच्या यादीत नाशिकने अकराव्या स्थानी झेप घेतली. पूर्वी या यादीत विभाग तसा तळाशीच होता. महाराष्ट्रापुरता विचार केल्यास मुंबईखालोखाल मालवाहतूक ओझर विमानतळावरून झाली. राज्यातील तिसरे विमानतळ या पंधरा ठिकाणांच्या यादीत नाहीच.

नाशिक विमानतळावरून (ओझरचे एचएएल एअरपोर्ट) प्रवासी विमानसेवेच्या शुभारंभाला वीसेक वर्षे उलटून गेली. मुंबईपासून सुरू झालेली उड्डाणे दिल्ली, बेंगळुरूसह सात-आठ शहरांपर्यंत पोहोचू शकली. पहिले आंतरराष्ट्रीय उड्डाण आणि नाइट लँडिंग सुविधा सुरू होऊनही बराच काळ लोटला. अर्थात, ही चार्टर्ड विमाने असल्याने त्यांना आंतरराष्ट्रीय सेवा म्हणायचे का, हा वादाचा मुद्दा. देशांतर्गत प्रवासी सेवा सुरू असली, तरी मालवाहतूक क्षेत्रात सातत्य नव्हते. सात-आठ वर्षांपूर्वी कार्गो सेवेचा शुभारंभ झाला. मात्र, उत्पादन आहे तर विमान नाही आणि दोन्ही उपलब्ध असल्यास तांत्रिक परवानग्यांसह इतर अडचणी, अशा कात्रीत सेवा सापडत. आता मात्र चित्र पालटल्याचे दिसते.

कांदा, डाळिंब, द्राक्षे, भाजीपाल्यासह शेळ्या-मेंढ्यांचीही बऱ्यापैकी निर्यात नाशिकहून होते आहे. युरोप, मध्य आशियासह आखाती देशांत कार्गोची उड्डाणे सुरू आहेत. १ मे ते २० जून या पन्नास दिवसांत शंभर विमानांद्वारे ऐंशी हजार बकऱ्या आखाती देशांत पाठविण्यात आल्या. एकट्या मे महिन्यात विक्रमी १,१४६ टन मालवाहतूक ओझरहून झाली. मागील आर्थिक वर्षात हा आकडा ४,२८० टन होता, जो आधीच्या वर्षाच्या तुलनेत ५४ टक्के अधिक. 'यूएई'तील अल् खैमाह आंतरराष्ट्रीय विमानतळ (राकिया), नाशिक विमानतळ आणि येथील ॲमिगो लॉजिस्टिक्स यांच्यातील सहकार्य कराराने निर्यातीत मोलाची भूमिका बजावली. यापूर्वी नाशिकच्याच सानप ॲग्रिकल्चर कंपनीनेही हवाई निर्यातीला मोठा हातभार लावला होता. सध्या ही कंपनी मुंबई विमानतळावर कार्यरत राहून नाशिकशी स्पर्धा करते, हेही विशेषच.

या मालवाहतूक सेवेने भरारी घेतल्याने जगाच्या हवाई नकाशावर नाशिक पुन्हा एकदा अधोरेखित झाले. नाशिकसह जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नगर जिल्ह्यातील कृषी, औद्योगिक, औषधे आणि इतर उद्योगांची उत्पादने तसेच शेळ्या-मेंढ्या मोठ्या प्रमाणात भारतासह परदेशातील बाजारपेठांमध्ये पाठवून हवाईसेवेची फळे चाखता येतील. राज्याच्या सहा विभागांत मिळून शेळ्या-मेंढ्यांचे पालन करणाऱ्या २,२५० संस्था आहेत. पैकी सर्वाधिक बाराशे संस्था एकट्या खान्देशात आहेत. त्यातूनच जिल्ह्यातील शेळी-मेंढी पालन विस्तारत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी आणि खासकरून तरुणाईला हवाई व्यापार आणि रोजगार मिळतो आहे. उत्पादनांसाठी नव्या बाजारपेठा खुल्या होत आहेत. धरसोडीची धोरणे टाळली गेल्यास परदेशात शेतमालाला मागणी वाढू शकते. 'कार्गो ट्रान्स्पोर्ट' आणखी भरारी घेऊ शकते; पण त्यासाठी आधी तांत्रिक अडसर दूर व्हावा. नाशिक विमानतळाचे नियमन संरक्षण खात्याकडे असल्याने निर्यातदार तसेच कंपन्यांना परवानग्या मिळविताना वेळ व पैशांचा अपव्यय होतो. ते टळायला हवे. विमानतळावरील समांतर धावपट्टीसाठी दोनशे कोटींची मान्यता नुकतीच मिळाली खरी; परंतु भविष्यकालीन गरजा लक्षात घेता टर्मिनलच नव्हे, तर स्वतंत्र नागरी विमानतळाची निकड जाणवते. आगामी सिंहस्थ पर्वाच्या पार्श्वभूमीवर 'समृद्धी'सह रस्ते व रेल्वेमार्गांची होत असलेली कनेक्टिव्हिटी आणि वाढवण बंदराची उभारणी पाहता, या दृष्टीने तातडीने पावले उचलणे आवश्यक बनले आहे.

# गुरु पौर्णिमा

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ट्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरू देव नमः अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य



आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील. आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

## वाचक पत्र




### गुरु शिष्याचे आगळे नाते !

गुरु-शिष्य परंपरा हे भारताचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. अनादी काळापासून ही परंपरा अखंड चालत आली आहे. गुरु शिष्याची अनेक उदाहरणे अगदी शालेय जीवनापासून आजतागायत आपण अभ्यासली आहेत. सामान्यांसाठी जसा दिवाळी दसरा तसा साधक आणि शिष्यांसाठी गुरुपौर्णिमा उत्सव. साधकाची भगवंताशी भेट घडवून आणतो तो गुरु. अर्थात नुसती भेट घडवून आणणे नव्हे, तर त्या भेटीसाठी साधकाला पात्र बनवण्याचे काम गुरु करत असतात. दगडाला हातोड्याचे आघात देऊन त्यातून देवतेचे सौंदर्य साकारण्याचे काम जसा एक शिल्पकार करतो तसे साधकावरील दोषांचे आणि अहंकाराचे आवरण नष्ट करून त्याच्यातील परमात्म्याच्या अंशाला जागृत करण्याचे काम गुरु करत असतात. साम, दाम, दंड, भेद या सर्वांचा वापर करून ते साधकाला शिष्य आणि शिष्याला भक्त बनवतात. जोपर्यंत आपल्या शिष्याची आध्यात्मिक प्रगती होत नाही तोपर्यंत त्यांनाही चैन पडत नाही. असे हे गुरु शिष्याचे आगळे नाते. गुरु करत असलेल्या कृपेची परतफेड करणे खरेतर शक्यच नाही; मात्र तरीही गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या गुरूंना काहीतरी गुरुदक्षिणा देऊन गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा शिष्य प्रयत्न करत असतो. प्रत्येकाच्या जीवनात कधीनाकधी कोणीनाकोणी गुरुस्वरूपात भेटतेच. यंदाच्या गुरुपौर्णिमेला त्यांच्याप्रती न चुकता कृतज्ञता व्यक्त करूया !

**- नरेश घरत, चेंबूर (मुंबई)**

### मनात गुरूराज..

मनात आपल्या एक
सद्गुरू असे लपला
दिशा दाखवी नेहमी
तोल सावरी आपला

अदृश्य राहतो कायम
रंध्रारंध्रात तो व्यापला
जागृत स दक्ष सदैव
कधीचं न तो झोपला

जागेकरे संकटकाळी
हळूचं मारितो टपला
त्याला हरवण्यासाठी
मनात राक्षस टपला

सावध करतो वेळेत
करता आपण गफला
आपल्यातला माणूस
कितीदा त्याने जपला

सद्गुरू होता प्रभावी
प्रकाश जातो दिपला
दुर्लक्ष करिता त्याला
प्रयास सगळे विफला

ऐकाता जरासे त्याचे
आयुष्य होई सुफला
याच्या कसोटी वरती
माणूस जातो मापला

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध... अचूक बातमी



# गुरु तोचि देव !

आत्म्याचे परमात्म्याशी म्हणजेच प्राणिमात्राचे भगवंताशी मिलन घडवून आणतो तो गुरु. गुरु-शिष्य परंपरा हे पवित्र भारतीय संस्कृतीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. 'सद्गुरू वाचोनि सापडेना सोय, धरावे ते पाय आधी त्याचे' हे संतवचन गुरूंचे जीवनातील अनन्यसाधारण महत्व प्रतीत करते. व्यवहारातील लहानसहान कामामध्ये आपल्याला कोणाचे ना कोणाचे मार्गदर्शन घ्यावे लागते. रामायण-महाभारत काळापासून गुरूंचे महत्व किती असाधारण आहे हे आपण गोष्टींमधून, शालेय अभ्यासक्रमातून शिकत आलो आहोत. हिंदू धर्मात आज अनेक संप्रदाय आहेत, त्यांचे साधनामार्ग वेगळे आहेत; मात्र प्रत्येक मार्गातून भगवंतापर्यंत नेणारा सामायिक टप्पा हा 'गुरु' आहे. शालेय जीवनात शिक्षक हे गुरुस्वरूप असतात. विद्यार्थ्याला व्यावहारिक ज्ञान देऊन ते त्याला भौतिक जीवनात यशस्वी होण्यासाठी घडवत असतात. आजमितीला विद्यार्थ्यांमधील शिक्षकांविषयी असलेला आदर कमी होऊ लागला आहे. शिक्षक रागावले म्हणून शिक्षकांचा सूड घेण्याचाही घटना घडू लागल्या आहेत. यासाठी शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांच्या मनावर गुरूंचे महत्व बिंबवणे आवश्यक आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

# गुरूंना त्रिवार वंदन करण्याचा दिवस, गुरुपौर्णिमा

भारतात आषाढ पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी गुरुंना वंदन केले जाते, त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते.आईवडील हे प्रत्येक व्यक्तीचे पहिले गुरू असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपले जीवनविश्व सुरू होते. आईवडील, वडीलधारी मंडळी, नातेवाईक, शाळेतील शिक्षक, कॉलेज मधील प्राध्यापक हे सगळे आपले गुरू असतात.

यांनी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आपल्याला ज्ञान दिलेले असते. जीवनाचा सन्मार्ग दाखवलेला असतो.आपल्या हातून एखादी चूक झाली की त्यांनी आपले कान पिळलेले असतात. प्रसंगी पाठीत एखादा धपाटा घातलेला असतो. तेव्हा आपण वाईट वळणे सोडून सरळ वाट धरलेली असते. आपल्या गुरुंनी निकोप भावनेने आपल्याला घडवलेले असते. चांगले काय नि वाईट काय यातला फरक गुरुंमुळे समजतो. अशा गुरुंना त्रिवार वंदन!

ज्ञानाचे चालते बोलते विद्यापीठ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार बाबासाहेबांनी जीवनभर केला. आणि गुरुंना वंदन करून कृतज्ञता व्यक्त केली आहे. बाबासाहेबांचे तीन गुरू आणि त्या गुरुंचा एक शिष्य हे अद्भूत नाते अन्य कोठे पाहायला मिळत नाही. गुरु शिष्याचे नाते हे एक अलौकिक व आपुलकीचे नाते असते. हे नाते भारतीय संस्कृतीत सर्व श्रेष्ठ नाते आहे. ह्या नात्यांना सर्वांनी जीवापाड जपले पाहिजे. या नात्याचे पावित्र्य आपण सर्वांनी अबाधित ठेवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. कारण आजचे उनाड शिष्य आणि कर्तृत्वाचा ठसा न उमटवणारे गुरू पाहिले की मनाला खूप वेदना होतात!गुरुपौर्णिमे दिवशी मला माझ्या गुरुंची आठवण हमखास होते कारण माझे सर्व गुरू अतिशय कर्तृत्ववान, चारित्र्यवान आणि ज्ञानसंपन्न होते. माझ्या गुणवान व प्रतिभावान गुरुंना त्रिवार वंदन!

जि.प.प्राथमिक शाळा उमरगा कोर्ट या शाळेत माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. या शाळेतील समांधे सर, भोरे सर, गंगाधरराव मोरे, भाऊराव डोंगरे आणि व्यंकटराव घुमाडे यांनी आमच्या शैक्षणिक जीवनाचा पाया रचला. माझे माध्यमिक शिक्षण गावातील शांतिनिकेतन विद्यालयात पार पडले. या शाळेतील सर्व शिक्षक अतिशय गुणसंपन्न व ज्ञानी होते. गणेशराव गुळवे गुरुजी, बंकटराव गरड, संभाजीराव परगे,अप्पाराव लोहारे, अनंतराव बोरोळे, विश्वनाथ चलवाड, वाय.एम.पाटील, रामराव सोमवंशी, दत्तात्रय सोमवंशी, हणमंत कांडमगीरे, तुकाराम दापके हे आमचे शिक्षक शिक्षकी पेशाचे पावित्र्य जपणारे होते. देशाची व समाजाची एकेक पिढी घडविण्यासाठी अहोरात्र कार्यरत होते. या शिक्षकांमुळे गोरगरीब व तळागाळातील विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने झाले. अनेक घरचे दारिद्र्य संपले. असे कार्यतत्पर शिक्षक लाभणे म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांचे थोर भाग्यच जणू. आमचे हे शिक्षक आमचे दीपस्तंभ होते. गुरुपौर्णिमेनिमित्त आमच्या या गुणवान गुरूंना त्रिवार वंदन! त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आम्हाला आजही सार्थ अभिमान वाटतो. स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी जीवाचे रान करणाऱ्या सर्व गुरुंना गुरुपौर्णिमेच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!


**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आज टाकळीढोकेश्वर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त शिष्यगण मेळाव्याचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे आज गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रामदास भाऊसाहेब बांडे शिष्य मंडळ आयोजित गुरुपौर्णिमा उत्सव २०२५ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यासाठी लोकनेते खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पा., जिल्हा मराठा प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी, अशोकशेठ कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. या शिष्यगण मेळाव्यासाठी गुरुवार, दि.१० जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज रोकडे (वडगाव सावताळ) यांचे सुश्राव्य प्रवचन होईल. सकाळी ११ वाजता सर्व गरजवंतांना वस्त्र वाटप होणार असून सकाळी ११ ते ५ वा. या वेळेमध्ये अशोक गंगाराम चव्हाण, महेश धोंडीराम सर्वश, महेश रामदास बांडे यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन ही या ठिकाणी करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला आपण सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन टाकळी ढोकेश्वर सरपंच, उपसरपंच, चेअरमन व्हा.चेअरमन, सर्व पत्रकार बांधव, भैरवनाथ मित्र मंडळ, बनाई मित्र मंडळ, नवभारत मित्र मंडळ, समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर व सर्व शिष्यगण परिवार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## पंढरपुर येथे मठाच्या बांधकामासाठी कुमार शिंदेंकडून ५ लाखाची मदत

**अक्षराज : रियाज मुजावर**



**दि.०९, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्यातील वारकरी संप्रदायाच्या वतीने पंढरपुर येथे बांधण्यात आलेल्या मठाचे काम निधी अभावी अर्धवट स्वरूपात आहे. महाबळेश्वर तालुक्यातील वारकरी मंडळाचे कार्याध्यक्ष व त्यांचे सहकारी कोंडीराम ढाणक (बुवा) व पांडुरंग सपकाळ सी.डी.बावळेकर यांनी दातृत्वासाठी सर्वश्रुत असलेले माजी नगरसेवक कुमार शिंदे यांच्याशी संपर्क करून मठाच्या बांधकामासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. त्यानूसार आषाढी एकादशीचे औचित्य साधून पंढरपूर येथील महाबळेश्वर तालुक्याच्या वारकरी मंडळाच्या मठाला भेट देऊन या मठाच्या बांधकामाला ५ लाख रूपयांची मोठी आर्थिक मदत केली. यावेळी माजी नगरसेवक संतोष शिंदे, प्रशांत आखाडे, अजय कांबळे, विशाल जगदाळे अशोक सपकाळ उपस्थित होते.

## नवी मुंबई कलासाधना सामाजिक संस्था तर्फे पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०९, नवी मुंबई :** नवी मुंबई येथील कलासाधना सामाजिक संस्था तर्फे ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रस्तरीय परमपूज्य साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, परमपूज्य साने गुरुजी समाजभूषण पुरस्कार, परमपूज्य साने गुरुजी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या श्रेत्रातील व्यक्ती आपला प्रस्ताव पाठवू शकता. वैयक्तिक, शिक्षण, शिक्षक, प्राध्यापक, खेळ, कला, चित्रपट, चित्रपटगृह, लिटरेचर, राजकारण, सामाजिक, इतिहास, बँकिंग, वित्त. प्रेस, मीडिया, वैद्यकीय, लेखक, कवी, कलाकार, चित्रकार, आरोग्य सेवा इतर क्षेत्रातील मान्यवर आपले नामांकन ७२०८१०१५८२ या क्रमांकावर पीडीएफ स्वरूपात पाठवण्याचे आवाहन संस्थे मार्फत करण्यात येत आहे. पुरस्कार स्वरूप आकर्षक स्मृतिचिन्ह / सन्मानपत्र / पुस्तक/ आकर्षक मेडल इ. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्कारांसाठी आपले प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे. या पुरस्कारांसाठी आपण आपले प्रस्ताव पाठवू शकतात. प्रस्ताव / नामांकन पाठवण्याची अंतिम तारीख ३० जुलै २०२५ ही असेल. त्यानंतर येणारा प्रस्ताव / नामांकन पुरस्कारांसाठी विचारात घेतले जाणार नाहीत असे संस्थे तर्फे सांगण्यात येत आहे. नामवंत आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत नवी मुंबई येथे भव्य दिव्य कार्यक्रमात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्कारासाठी निवड झालेल्या नंतर त्या बाबत माहिती देण्यात येईल. जास्तीत जास्त मान्यवरांनी या पुरस्कारासाठी आपला अर्ज करावा असे आयोजकांमार्फत आव्हान करण्यात येत आहे.

## रुईछत्रपती येथील ग्रामपंचायतचा गजब कारभार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रुछत्रपती येथील ग्रामपंचायतीमध्ये गजब कारभार पहावयास मिळाला.सदर ग्रामपंचायती मधे ग्रामविकास अधिकारी येत नाही. अनेक वेळा तक्रारी, लेखनिवेदन माहीतीच्या अधिकारात ही दोन वेळेस मागणी करुन ही अधिकारी येतच नाही. पारनेर तालुक्यातील रुईछत्रपती येथे ग्रामपंचायतने गावामध्ये सिमेंट बेंच आणून बसविले. मात्र हे सिमेंट बेंच बाजार भावापेक्षा चढ्या भावाने आणून गैरव्यवहार केला असल्याचा आरोप येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन बारवकर यांनी केला आहे. त्यांनी याबाबत पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करून सदर बाकडे खरेदीच्या व्यवहाराबाबत चौकशी करून दोषी आढळल्यास ग्रामसेवक यांच्यावर कडक कारवाई करून निलंबित करावे अशी मागणी केली आहे. निवेदनात बारवकर यांनी सांगितले आहे की, ग्रामसेवक ग्रामसभा बोलवत नाही. मुख्यालयी राहत नाहीत. माहिती अधिकारात माहिती उपलब्ध करून देत नाहीत. तसेच वरिष्ठांचे पत्र दाखविले तरी उडवा उडविचे उत्तर देत असतात. तसेच गेल्या ३ वर्षात ऑडिट निरीक्षणात अनियमितता असूनही कसल्याही प्रकारची ग्रामपंचायत कारभारात सुधारणा नाही माहिती अधिकारात अर्जाची दोन वेळा सुनावणी होऊनही ग्रामसेवक हजर होत नाहीत. तसेच बीडीओ साहेब पण उडवा उडविचे उत्तर देत असतात.

# सानपाडा विभागातील ५५० भाविकांना मोफत पंढरपूर यात्रा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, सानपाडा (ठाणे) :** शिवसेना शाखा सानपाडाच्या वतीने माजी नगरसेविका कोमल सोमनाथ वास्कर आणि माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर या दाम्पत्याने सानपाडा विभागातील भाविकांना श्री पांडुरंगाच्या दर्शनाला नेण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. आषाढी एकादशी निमित्त वास्कर दाम्पत्याने जवळपास ५५० भाविकांना मोफत श्री क्षेत्र पंढरपूर यात्रा घडवून आणली. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसह महिला भाविकांची संख्या जास्त होती.



सानपाडा मधील भाविकांसाठी सोमनाथ वास्कर यांच्यासह गायत्री ट्रान्सपोर्टचे अजिंक्य शिवणकर, नितीन मगर, दत्ता ठाकूर, मिलिंद मनवर यांनी प्रवासात आणि श्री क्षेत्र पंढरपूर येथे सोयी-सुविधा पुरविण्यासाठी सहकार्य केले.

प्रत्येक भाविकाला सानपाडा ते पंढरपूर आणि परत असे सुखरुप आणण्यासाठी शिवसेना शाखा आणि श्री दत्त मित्र मंडळाच्या पदाधिकारी-स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. पंढरपूर प्रवासासाठी जवळपास ७५० नागरिकांनी नाव नोंदणी केली होती. पण, काही कारणास्तव जवळपास २०० जणांना येणे शक्य झाले नाही. त्यामुळे उर्वरित ५५० जणांसोबत आम्ही पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घडविल्याचे सोमनाथ वास्कर यांनी सांगितले. दरम्यान, जून महिन्यामध्ये वास्कर दाम्पत्याने सानपाडा मधील सुमारे ६०० अबाल-वृध्दांना गोवा येथे मोफर सफर घडवून आणली होती.

# फेरीवाला मुक्त दिवा करण्यासाठी भाजपाकडून उद्या रास्ता रोको आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दिवा (ठाणे) :** भारतीय जनता पार्टी कडून ११ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिवा भाजपकडून देण्यात येण्यात आला आहे. या आंदोलनाला भाजपाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संदीप लेले, कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब तसेच दिव्यातील सर्व भाजपा पदाधिकारी रस्ता रोको आंदोलन मध्ये सहभागी होणार आहेत.

दिनांक ९ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता भाजपा दिवा-शिळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन दिवा शहर फेरीवाला मुक्त करण्यासाठी विनंती केली आहे. जर का १० जुलै २०२५ रोजी



पर्यंत दिवा शहर हा फेरीवाला मुक्त झाला पाहिजे. नाहीतर ११ जुलैला भाजपाकडून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

रेल्वे स्टेशन पासूनचे १५० मीटर अंतर फेरीवाला मुक्त ठेवण्याचा सुप्रीम कोर्टाचे ऑर्डर असताना सुद्धा फेरीवाले राजरोसपणे रस्त्यावर हातगाड्या लावून व्यवसाय करत आहेत. फेरीवाले रस्त्यावर व्यवसाय करत असल्यामुळे वारंवार अपघात होत असतात. काही नागरिक जखमी झाले आहेत तर काही जणांचा मृत्यूही झाला आहे. दिवसेंदिवस फेरीवाल्यांची दादागिरी वाढत आहे. फेरीवाले नागरिकांवर हल्ले सुद्धा करत आहे. त्यामुळे दिव्यातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. म्हणूनच नागरिकांच्या सुरक्षेसाठी भारतीय जनता पार्टीने निष्क्रिय ठाणे महानगरपालिका प्रशासनविरुद्ध रास्ता रोको आंदोलन करण्याचे ठरवले आहे. यासाठी दिव्यातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात आले की मोठ्या संख्येने दिवेकरानी या आंदोलनांमध्ये सहभागी व्हावे अशी विनंती दिवा-शिळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी केली आहे.

# मुंबईतील ऐतिहासिक कर्नाक पुलाचे नामकरण 'ऑपरेशन सिंदूर पुल'

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, मुंबई :** मुंबईतील मध्यरेल्वेच्या मशीद बंदर स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि' मेलो मार्गाला जोडणाऱ्या बहुप्रतीक्षित ऐतिहासिक कर्नाक पुलाचे नामांतर करण्यात आले असून आता 'ऑपरेशन सिंदूर पुल' हे नाव या पुलास देण्यात आले आहे.

हा कर्नाक पुल धोकादायक ठरवण्यात आल्याने पाडण्यात आला. मात्र या पुलाच्या उभारणीस प्रदीर्घ कालावधी लागला. त्यानंतर हा पुल तयार होऊनही त्याचे उद्घाटन होत नसल्याने स्थानिक नागरिकांच्या वतीने शिवसेना आणि मनसेने येथे आंदोलन केले होते.

आता कर्नाक ब्रिजचे नामकरण विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या मागणीनुसार ऑपरेशन सिंदुरवरुन ऑपरेशन सिंदुर पुल असे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पुलाचे उद्घाटन आता येत्या गुरुवारी १० तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

भारताने पाकिस्तान विरुद्ध राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरला समर्पित करत या उड्डाण पुलाचे नाव सिंदूर ठेवण्यात आले आहे.

आणि आता, लवकरच हाबहुप्रतीक्षित आणि ऐतिहासिक पूल वाहनधारक आणि पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात येत आहे. दक्षिण मुंबईतील पूर्व – पश्चिम भागांना जोडणाऱ्या या पुलावरून दोन्ही दिशेने वाहतूक सुरू होऊन नागरिकांना सुलभ पर्याय उपलब्ध होणार आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त



(प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्या नेतृत्वाखाली पूल विभागाचे अभियंते यांनी सिंदूर (पूर्वीचे कर्नाक) उड्डाणपुलाची उभारणी विहित कालमर्यादेत १० जून २०२५ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

दक्षिण मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद बंदर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी सिंदूर (पूर्वीचे कर्नाक) पूल महत्त्वाचा आहे. १५० वर्ष जुना कर्नाक पूल धोकादायक झाल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाने घोषित केले. त्यानंतर मध्य रेल्वे प्रशासनाने ऑगस्ट २०२२ मध्ये पुलाचे निष्कासन केले.

मस्जीद बंदर परिसरात पूर्व आणि पश्चिम परिसर जोडणारा विद्यमान मार्ग कायम ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने या पुलाची पुनर्बांधणी केली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार सिंदूर (पूर्वीचे कर्नाक) पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे.

या पुलाची एकूण लांबी ३२८ मीटर असून रेल्वेच्या हद्दीत ७० मीटर इतकी आहे. महानगरपालिका हद्दीतील पोहोच रस्त्याची एकूण लांबी २३० मीटर असून पूर्वेस १३० मीटर व पश्चिमेस १०० मीटर इतकी आहे.

लोहमार्गावरील पुलाच्या उभारणीकामी आरसीसी आधारस्तंभ यावर प्रत्येकी ५५० मेट्रिक टन वजनी ७० मीटर लांब, २६.५० मीटर रूंद आणि १०.८ मीटर उंचीच्या दोन तुळया स्थापित करण्यात आल्या आहेत. आरसीसी डेक स्लॅब, डांबरीकरण, म हानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्व आणि पश्चिम बाजूचे पोहोच रस्ते इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

मुंबई शहराच्या दक्षिणेतील पी. डि मेलो मार्गाकडील बंदर भाग आणि क्रॉफर्ड मार्केट, काळबादेवी, धोबी तलाव ह्या वाणिज्यक भागांना लोहमार्गावरून पूर्व – पश्चिमेला जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे.

मुंबई शहराच्या दक्षिणेतील पी. डि' मेलो मार्गाकडील बंदर भाग आणि क्रॉफर्ड मार्केट, काळबादेवी, धोबी तलाव ह्या वाणिज्यक भागांना लोहमार्गावरून पूर्व – पश्चिमेला जोडणारा हा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

दरम्यान या पुलाच्या पुनर्बांधणीमुळे सुमारे १० वर्षापासून बाधित झालेली पूर्व – पश्चिम वाहतुकीसाठी सुविधा उपलब्ध होणार. पूल कार्यान्वित झाल्यावर पी डि मेलो मार्ग विशेषतः वालचंद हिराचंद मार्ग व शहीद भगतसिंग मार्ग यांच्या छेदनबिंदूवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. पुलाच्या पुनर्बांधणीने युसुफ मेहरअली मार्ग, मोहम्मद अली मार्ग, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, काझी सय्यद मार्ग यावरील वाहतूक सुलभ होणार आहे.

# पाटण तालुक्यात 'बेंदूर सण' मोठ्या उत्साहात साजरा






**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** वर्षातील बेंदूर या सणाची फक्त शेतकरी नाही तर बैल राजा आतुरतेने वाट बघत असतो. १ दिवस फक्त विश्रांती नाही तर आपल्या मालकाकडून लाड करून घ्यायचा दिवस असतो. शेतकऱ्यांच्या सुखदुःखात सदैव साथ देणारा जिवाभावाचा सोबती खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची संपत्ती म्हणजे अर्थातच बैल. आपल्या देश कृषिप्रधान संस्कृती जोपासणारा महाराष्ट्रात दरवर्षी बेंदूर मोठ्या प्रमाणात शेतकरी साजरा करत असतो. शहरीकरणात व औद्योगीकरणाचा युगात बैल कामाची जागा काही प्रम ाणात ट्रॅक्टर ने घेतली. त्यामुळे काही ठिकाणी ट्रॅक्टरची बळीराजाने पूजा केली सकाळपासून बळीराजा बैलाची सेवा कराण्याची लगबग सुरू होती बैलाला धुऊन बैलांच्या शिंगावर नक्षी काढून गोंडे लावून बाशिंग बांधून झूल घालून बैलांना मोठ्या प्रमाणात सजवण्यात आले होते. तर ग्रामीण भागातून बैलांची गावातून मिरवणूक काढताना दिसत होत्या. पाटण शहरातही बैलांची मिरवणूक मोरे गल्ली, ब्राह्मणपुरी लायब्ररी चौक, मुख्य बाजारपेठ, झेंडा चौक, जुने बस स्थानक, नवीन बस स्थानक रामपूर या मार्गावर मि रवणूक बैलांची काढण्यात आली होती. या मिरवणुकीत लहान मुलांपासून ते वयोवृद्ध मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. तर बेंदूर सणाच्या आदल्या दिवशी बळीराजाने बैलांचे खांदे मळून सकाळी पानवठ्यावर नेहुन बैलांना स्वच्छ धुऊन शिंगे घोळून शिंगावर नक्षीकाम करण्याची दुपारपर्यंत लगबग सुरू होती. बैलांची नक्षीकाम काढून झाल्यानंतर शिंगाला गोंडे बाशिंग झूल घालून सजवण्यात आले होते. तर बळीराजाची बैलांची सेवा करण्याची लगबग मोठ्या प्रमाणात दिसत होती. तर प्रत्येक घरात मातीच्या बैलांची पूजाअर्चा करण्यात आली होती. बैलांची पूजा अर्चा करून बैलांना पुरण पोळीचा नैवेद्य भरवून बेंदूर सण मोठा प्रमाणात साजरा करण्यात आला.

# कळव्यात पाणी पेटलं; पाण्यासाठी नागरिकांची प्रभाग समितीवर धडक



**अक्षराज : संजय पंडित**

**दि ०८, कळवा (ठाणे) :** ठाणे शहरात पाण्याची टंचाई भासू लागल्यानंतर कळव्याचा पाणीसाठा ठाण्याला वळवण्यात आल्याने कळव्यात मोठ्या प्रमाणात पाणी कपात केली जात आहे. त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार शहराध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्ष सुजाताताई घाग, नताशा आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली जोरदार मोर्चा काढण्यात आला. यावेळेस आंदोलकांनी प्रभाग समिती कार्यालयासमोर मडके फोडून निषेध व्यक्त केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २७ लाख इतकी आहे. शहरासाठी प्रतिदिन ६१६ दशलक्ष लीटर इतका पाण्याचा कोटा मंजुर आहे. प्रत्यक्षात शहराला दररोज ५८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा होतो. त्यामध्ये महापालिकेच्या स्वत:च्या पाणीपुरवठा योजनेतून २५० दशलक्ष लिटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लीटर, स्टेम कंपनीकडून ११५ दशलक्ष लिटर आणि बृहन्मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. ठाणे महापालिका क्षेत्राचे गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे.

वाढत्या नागरीकरणाच्या तुलनेत शहरात पुरेसा पाणी पुरवठा होत असल्याचा दावा प्रशासन करत असले तरी शहरात पाणी टंचाईची समस्या जाणवत आहे. त्यातच कळव्याला होणारा पाणीपुरवठा आता ठाण्यात वळविण्यात आला असल्याने कळवा, खारीगाव, विटावा, डोंगरातील परिसरात सर्वसामान्य जनतेला दैनंदिन जीवनासाठी पुरेल एवढं सुद्धा पाणी ठाणे महानगरपालिकेतर्फे देण्यात येत नाही. तसेच जे पाणी सोडण्यात येत आहे, ते गढूळ स्वरूपाचे आहे. पाण्याचा प्रश्न हा सर्वसामान्य जनतेला जीवनामरणाचा प्रश्न झालेला आहे. त्यामुळे प्रशासनाला जाग करण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सांगण्यात आले. या आंदोलकांनी रिकामे हंडे घेऊन पालिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच, प्रभाग समितीसमोर मडके फोडून निषेध केला.दरम्यान या प्रसंगी नताशा आव्हाड यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. एकीकडे ठाण्यात उड्डाणपुलांना रंगरंगोटी करण्यात येत आहे.

मात्र, पाण्यासारखी मूलभूत गरज जर ठामपाला भागवता येत नसेल तर कसे होणार? ठाण्यात जास्त पाणी दिले जात असेल आणि कळव्याला पाणी दिले जात नसेल तर फक्त ठाण्यातच माणसे राहतात का? असा सवाल नताशा आव्हाड यांनी उपस्थित केला. कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांनी हा मोर्चा फक्त झाकी आहे, मुख्य आंदोलन बाकी आहे, असा इशारा दिला. तर, जिल्हाध्यक्ष सुहास देसाई यांनी ठाण्यात अनधिकृत बांधकामांना द्यायला पाणी आहे. पण, नागरिकांना पाजायला पाणी नाही, हे खेदजनक आहे. आज कार्यालयात खुर्च्या उबवणारे हे अधिकारी जर पाणी देऊ शकत नसतील तर त्यांना पदावर बसण्याचा अधिकार नाही, असे म्हटले. या आंदोलनात राजू खारकर, पुजा शिंदे, राजेश साटम, राजेश कदम, संगीता लोकर, साबिया मेमन, मेघा गवते, राजू शिंदे, समीर नेटके, दिलीप उपाडे, ज्ञानेश्वर राजपंखे, अंकुश मढवी, पद्माकर पाटील, रिंकू यादव, प्रमोद येरूणकर, सोनाली कदम आदी सहभागी झाले होते.

# गुरुपौर्णिमेच्यानिमित्त श्रमजीवी संघटना करणार तालुका अध्यक्ष, सचिवांच्या नियुक्त्या जाहीर

**अक्षराज : विनायक भोईर**

**दि.०९, उसगाव (पालघर) :** श्रमजीवी संघटनेतर्फे एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, संघटनेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी व स्थानिक पातळीवर जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी श्रमजीवी संघटना राज्यातील पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष व सचिव यांची नियुक्ती जाहीर करण्यात येत आहे. या नवीन नियुक्त्यामुळे संघटनेचे कार्य अधिक सशक्त व परिणामकारक होणार आहे. तालुका स्तरावर ग्रामीण व शहरी भागातील श्रमिक, आदिवासी, वंचित घटक यांचे हक्क आणि मागण्या शासनदरबारी ठामपणे मांडण्यास या पदाधिकाऱ्यांची भूमिका मोलाची ठरणार आहे. या निवडी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित, संस्थापिका विद्युल्लता पंडित तसेच अध्यक्ष रामभाऊ वारणा यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेच्या ध्येय धोरणनुसार पार पडणार असून, प्रत्येक तालुक्यातील अध्यक्ष आणि सचिवांना त्यांच्या जबाबदाऱ्या देण्यात येणार आहेत.

तालुका अध्यक्ष व सचिव यांच्या निवडीची प्रक्रिया गेल्या तीन महिन्यापासून सुरु होती. विविध स्तरावरच्या सल्ला मसलती घेऊन पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील तालुक्याचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या नियुक्त्या अंतिम केल्या असून गुरुपौर्णिमेच्या शुभदिनी लवकरच या नवनियुक्त तालुका प्रमुखांच्या अधिकृत यादया प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामध्ये नियुक्त्या अंतिम असलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा नियुक्ती पत्र देऊन सन्मान ही करण्यात येईल.

श्रमिकांचा आवाज धोरणकर्त्यांनपर्यंत पोहोचवणे व समाजातील गरीबातील गरीबाचे जीवनमान उंचावणे - या ध्येयासाठी नवे तालुका पदाधिकारी नि:स्वार्थपणे कार्य करतील, अशी अपेक्षा अध्यक्ष रामभाऊ वारणा यांनी व्यक्त केली आहे. हा कार्यक्रम पूज्य साने गुरूजी प्रशिक्षण संकुल, विधायक संसद, उसगाव डोंगरी, ता.वसई, जि.पालघर येथे गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता याठिकाणी होणार आहे.

## उत्कृष्ट कामाचा, निकृष्ट नमुना महिन्याभरातच...

# हिमायतनगर पळसपुर डांबरीकरण रस्त्याचे काम बोगस; नागरिकांमध्ये संताप

**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.०९, हिमायतनगर (नांदेड) :** शहरातून मराठवाडा पळसपुर डोलारी तर विदर्भ ढाणकी गावाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम नुकतेच एक महिन्यात करण्यात आला असून, अवघ्या महिन्यांत रस्त्याचे तीनतेरा वाजले आहेत. त्यामुळे महिन्याभरातच रस्ता खचून उखडला संबंधित ठेकेदाराने केलेल्या बोगस रस्ता कामाबद्दल नागरिक, शेतकरी, वाहनधारकातून तीव्र संतापाची लाट उमटतांन दिसत आहे.



हिमायतनगर शहरातून ढाणकी मार्गे विदर्भाकडे जाणाऱ्या हिमायतनगर ते सिरपल्ली पर्यंत रस्त्यासाठी मागील ४ वर्षांपूर्वी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. रस्त्याचे काम औरंगाबाद येथील एम.ए सिद्दीकी नामक ठेकेदारास देण्यात आले होते. संबंधित ठेकेदाराने अभियंत्याशी हातमिळवणी करून हिमायतनगर पळसपूर डोल्हारीपर्यंत रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने केले आहे.

रस्त्याचे काम करताना अनेक नागरिक, शेतकऱ्यांनी रस्त्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केला होता. मात्र नागरिकांच्या तक्रारी ना जुमानता ठेकेदारने मनमानी पद्धतीने थातुर माथूर रस्ता करून हिमायतनगर शहरानजीक रस्त्याचे काम अर्धवट ठेऊन शासन व जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली आहे. नुकताच झालेल्या डांबरी रस्ता कामास महिना उलटला नसताना हिमायतनगर पळसपूर डांबरीकरण रस्त्याची वाट लागली असल्याचे चित्र रस्त्यावर दिसून येत आहे. डांबरीकरण रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून ट्रॅक्टर सारख्या वाहनानेठीक ठिकाणी रस्ता खचला आहे. खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी पाहणी केली असता केवळ इंचभर डांबरीकरण केल्याचे दिसून येते आहे.

गुत्तेदाराच्या केलेल्या या मनमानी कामाकडे संबंधित अभियंत्याने देखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने शेतकरी, नागरिक, वाहनधारक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. हिमायतनगर ते पळसपूर या बोगस डांबरीकरण रस्ता कामाची प्रधानमंत्री ग्रामसडक रस्त्याच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी करावी, आणि दोषी गुत्तेदाराच्या एजन्सीचे नावं काळ्या यादीत टाकून हिमायतनगर शहरानजीक राहिलेल्या अर्धवट रस्त्यासह येथील नडव्याच्या पुलाचे काम चांगल्या गुत्तेदारा मार्फत काम पूर्ण कुरुन द्यावे. अशी मागणी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष नागोराव शिंदे पळसपुरकर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केली आहे.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत घर क्र- एफ-२०३, से-०३, ऐरोली, नवी मुंबई येथे वसंत साठे यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. त्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांस




जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतः हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. लोकशाही दिन दिवशी रोजी आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार सदर अनधिकृत बांधकाम परवानगी व्यतिरिक्त करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम सुनिल काठोळे, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले. तसेच दिवा गाव सर्कल येथील पदपथावर असणाऱ्या अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मजूर, जेसिबि, ब्रेकर, गॅसकटर, तसेच अतिक्रमण विभागाकडून पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# थोडक्यात

## वाशिंद येथील तरुणांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०९, शहापूर (ठाणे) :** तालुक्यातील वाशिंद शहरातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विनोद खंडागळे व शैलेश आंबवणे यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुणांनी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला आहे. काँग्रेसचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून या तरुण कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्ष प्रवेश केला आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जितेश विशे व माजी अध्यक्ष तथा माजी उपसभापती महेश धानके यांनी या तरुणांना काँग्रेस पक्षात प्रवेश दिला. विनोद खंडागळे, शैलेश आंबवणे यांच्यासह प्रदीप गरुड, सोमनाथ बनसोडे, विनोद राठोड, सोनू दाभणे सुरेश दाभणे, कल्पेश दाभणे, रवी गोसावी, दत्ता मोरे, भाऊ शेलार, हिरामण गवारे, सागर दाभणे यांच्यासह विविध पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेसच्या शहापूर मधील जनसंपर्क कार्यालय येथे काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी महिला तालुकाध्यक्ष संध्याताई पाटेकर, युवक अध्यक्ष अंकुश भोईर, पर्यावरण तालुकाध्यक्ष महेंद्र आरज, दत्तात्रय बरोरा, अनंता शिंदे, प्रसाद दुमाडे, अन्वर शेख, ज्योती परदेशी कैलास निकाळे, नितीन पाटोळे, नथु विशे, सुरेश झुंजारराव, सुरेंद्र साळवे आदी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांना पुस्तके आणि शालेय साहित्य वाटप

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०८, मुंबई :** मोगवीरा महाजन सेवा संघ बागवाडी होबळी आणि डोंबिवली स्थानिक समिती यांच्या वतीने डोंबिवली प्रीती सभागृह येथे विद्यार्थ्यांना पुस्तके आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष बाबू मोगवीरा यांच्या हस्ते पूर्वज माता श्री महिषमर्दिनी यांच्या पूजेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षपद राजू मेंडन वंदसे यांनी भूषवले. कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेचे हितचिंतक आणि मुख्य कार्यालयाचे मानद अध्यक्ष सुरेश कांचन यांनी केले. पाहुण्यांमध्ये असोसिएशनचे माजी अध्यक्ष महाबाला कुंदर, मुख्य कार्यालयाचे मानद मुख्य कोषाध्यक्ष नानू डी.चंदन, डोंबिवली शाखेतील मोगवीरा व्यवस्थापन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष सतीश श्रीयान, डोंबिवली समितीचे मानद अध्यक्ष यदुवीर पुत्रन, कार्यकारी अध्यक्ष भास्कर कांचन, सचिव राजू मोगवीरा तग्गरसे, उपाध्यक्ष संतोष पुत्रन, कोषाध्यक्ष बाबू मोगवीरा, शेखर नाईक यांचा समावेश होता. समितीचे कार्याध्यक्ष राजू मोगवीरा तग्गरसे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर मानद अध्यक्ष भास्कर कांचन यांनी समितीच्या कामकाजाची आणि त्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांची थोडक्यात ओळख करून दिली. त्यानंतर स्टेजच्या मध्यभागी, इंडोनेशियामध्ये झालेल्या योग स्पर्धेत दुसरे पारितोषिक जिंकणाऱ्या सुमती राजू मोगवीरा डोंबे आणि डोंबिवली समितीचे सक्रिय सदस्य आणि परोपकारी राजू मोगवीरा डोंबे यांचा सन्मान करण्यात आला.



## निवेदन देवन सुध्दा काम होत नाही

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०९, उदगीर (लातूर) :** उदगीर महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या वतीने,उदगीर नगर परिषदचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे की, वार्ड क्र.४, येथील खासिम पुरा जळकोट रोड उदगीर येथील गेल्या बऱ्याच वर्षापासून रस्त्याची व नाली कचऱ्याची दुरावस्था झाल्यामुळे नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो. विद्यार्थी व वयोवृद्ध लोक रस्त्यावरून चालत असताना पडत आहेत. तसेच या भागातील कुणी आजारी पेशंटला घेऊन जायचं असेल तर ऑटो चालक या भागातील रस्ता खराब असल्यामुळे येत नाही. तरी हा नाली व रस्ता लवकरात लवकर मुरुम किवा पक्की रोड तयार करून नागरिकांना होणारा त्रास दुर करावे. अन्यथा रोड व नालीच काम नाही झाल्यास महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या वतीने उदगीर नगर परिषद वर तिव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदन मुख्याधिकारी यांना देऊन सांगण्यात आले. यावेळी निवेदन देताना, महाराष्ट्र जनएकता संघटनेचे तालुका अध्यक्ष सिकंदर शेख शहर, अध्यक्ष नोमान सय्यद, शहर उपाध्यक्ष इस्माईल मनियार, शहर उपाध्यक्ष वजिर सय्यद, अभिजीत थोरे, चंद्रकांत कस्तुरे, समीर शेख, अलीम शेख, छावा मराठा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष प्रा.राजेश चव्हाण, जिल्हा अध्यक्ष उत्तम बिरादार इ. महाराष्ट्र जनएकता संघटनाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



## महादेव महाराज आडसूळ यांना वारकरी कीर्तन भूषण पुरस्कार जाहीर



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०९, कळंब (धाराशिव) :** राज्य गुणवंत कामगार असोसिएशन मुंबई व जागृत नागरिक सेवा संस्था महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने समाजाच्या सर्व घटकांची उन्नती व प्रगतीसाठी सातत्याने समाजभिमुख कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना विश्वकर्मा राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यामध्ये आदर्श संपादक, आदर्श पत्रकार, आदर्श शिक्षक, कामगार भूषण, सहकार भूषण, कृषिरत्न, उद्योग रत्न, उद्योग भूषण, गायन /साहित्य भूषण, योग शिक्षक /शिक्षिका यांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्काराचा समावेश आहे. धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष व निराधार बालक आश्रम चालक, कीर्तनकार ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ यांना राज्यस्तरीय पातळीवरील विश्वकर्मा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लवकरच कोल्हापूर येथे पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न होत असून या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुरेश केसरकर व सचिव अच्युतराव माने यांनी ह.भ.प. महादेव महाराज आडसूळ यांचे अभिनंदन केले आहे.